माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781

वर्ष १० वे. अंक १ ला नवी मुंबई दिनांक १ ते ३१ जानेवारी २०२१ पाने ८ किंमत २० रूपये




## नोकरशाहीवर तिसऱ्या डोळ्यांचा वचक हवा प्रत्येक सरकारी कार्यालयात सी.सी.टी.व्ही.लावा.

## जनमाहिती अधिकाऱ्यांचे माहिती नाकारण्याचे दस बहाने !

**लबाड लांडगा**
**ढोंग करतोय !**
**माहिती नाकारण्याचं**
**सोंग करतोय**

थांबवा ही बहाणेबाजी !

माहिती प्रश्नार्थक आहे
माहिती १५० शब्दापेक्षा अधिक आहे
माहिती तृतीय पक्षाची आहे
माहिती व्यक्तीगत आहे
माहिती आढळून येत नाही
सबब माहिती देता येणार नाही

**www.rtimahasangh.weebly.com**

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●

**शेखर कोलते**
●कार्यकारी संपादक●


**जिल्हा - प्रतिनिधी**

जयवंत टेंबूलकर (मुंबई)
प्रभाकर गंगावणे (रायगड)
अब्राहम आढाव (पुणे)
संतोष कदम (सातारा)
बंडोपंत चौगुले (सांगली)
अर्जन रामा असणे (जळगांव)
सोपान पवार (औरंगाबाद)
बळवंत जाधव (लातूर)
जयसिंग सिल्लोडे (जालना)
विलास प्रताप शिंदे (नांदेड)
गोपाळ तौर (बीड)
रोहिदास सावळे (धुळे)
रविकुमार गोरे (हिंगोली)
नामदेव चापके (परभणी)
उज्ज्वल राजपूत (नाशिक)
राजू शिंदे (नंदूरबार)
संतोष जाधव (यवतमाळ)


अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

**पत्ता : नागरिक अधिकार**
शॉप नं.०१ सेक्टर ०९ खांदा कॉलनी
नवीन पनवेल ४१०२०६
मो.९२२३५१६९२०
e- mail : mediamansubhash@gmail.com

: web site :
rtimahasangh.weebly.com



## संपादकीय..........



# अन्नदात्यांना देशद्रोही म्हणणं हा तर सरकारचा लोकद्रोह !

दिल्लीच्या बॉर्डरवर शेतकरी आंदोलन चालू आहे.शेतकरी विरोधी कायदे रद्द करा. ही शेतकऱ्यांची मागणी आहे.पण सरकार म्हणत आहे की हे कायदे शेतकरी हिताचे आहेत.मग प्रश्न असा निर्माण होत आहे की शेतकरी हित सरकारला जास्त कळतं की शेतकऱ्यांना ?

सरकारच्याकडं हे पाहिजे, आम्हाला ते पाहिजे अशा मागण्यासाठी आंदोलन होत असतात. हे पहिलं आंदोलन आहे जे म्हणतयं आम्हाला हे नको आहे.

सरकारंनं आणलेले कायदे शेतकरी हिताचे आहे की नाही ? हा प्रश्न वादविवादाचा आहे.पण सरकार ज्या पद्धतीने हे आंदोलन हाताळत आहे.यावरून सरकारची नियम चांगली नाही हे दिसून येत आहे.

हे आंदोलन गेले एक महिना झालं शांततेने व अहिंसक मार्गाने चालू आहे.देशाच्या राजधानी एकत्रीत येऊन आपला आवाज बुलंद करणं हा शेतकऱ्यांचा हक्क आहे.पण सरकार पोलीस बळाचा वापर करून शेतकऱ्यांना दिल्लीत प्रवेश करू देत नाही.

हे आंदोलक शेतकरी नाहीत. हे आंदोलक देशद्रोही आहेत. यांना पाकीस्तानातून पैसे पुरवला जातो. असे आरोप सत्ताधारी पक्षाकडून केले जात आहेत. असे आरोप करून सरकार स्वत:चा दुबळेपणा जगजाहिर करीत आहे.जर आंदोलक देशद्रोही आहेत व त्यांना पाकीस्तानमधून पैसा व रसद येत असेल तर मग या विद्यमान सरकारची गुप्तहेर यंत्रणा सपशेल फेल ठरलेली आहे असेच म्हणावे लागेल. जे देशद्रोही आहेत त्यांना पकडा आणि जेल मध्ये टाका पण अन्नदात्या शेतकऱ्या देशविरोधी ठरविणे हा राजकारण्यांच्या नीचपणाचा कळस आहे. आपल्याच देशातील नागरिकांना रस्ते खोदून व पाण्याचे फवारे मारून त्यांची प्रताडणा करणं हा सरकारचा लोकद्रोह आहे.

प्रत्येक भारतीय नागरिकांना त्यांच्या मागण्या घेऊन शांततेनं आणि अहिसंक मार्गाने एकत्र येऊन आंदोलन करण्याचा संघटीत होण्याचा संविधानीक हक्क आहे.लोक आंदोलनातूनच लोकशाही परिपक्व होत असते.याचा विसर केंद्र सरकारला पडला आहे.

सुप्रसिद्ध समाजवादी नेते राममनोहर लोहिया यांचे दोन वाक्य खूप प्रसिद्ध आहेत.ते कार्यकर्त्यांनी कायम लक्षात ठेवावेत.

पहिलं वाक्य आहे. जब रास्ते सूनसान होते हे तो संसद आवारा होती है !

राज्यसभेत बहूमत नसताना खोट्या पद्धतीने कायदे पास केले गेले हा संसदेचा आवारापणाच होता.

दुसरं वाक्य आहे <u>जिंदा कौम पाच साल तर इंतजार नही कर सकती.</u>

<u>या फसिस्ट सरकार विरोधात सर्व आवाज चिडीचूप असताना देशातील शेतकऱ्यांनी आपण जिंदा कौम असल्याचे दाखवून दिले आहे.</u>

# प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसवा - सर्वोच्च न्यायालयाचे आदेश !



पोलिसांकडून होणारे क्रौर्य रोखण्याच्या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाने २ डिसेंबर २०२० रोजी केंद्र, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सीबीआय, ईडी, एनआयए यासारख्या केंद्रीय अन्वेषण यंत्रणांसह प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये नाईट व्हिजन कॅमेरे असलेले सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश दिले.

राज्य आणि केंद्रशासित प्रदेश सरकारने हे सुनिश्चित केले पाहिजे की संबंधित राज्यात आणि / किंवा केंद्र शासित प्रदेशात कार्यरत असलेल्या प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.



तसेच ज्यात चौकशी केली जाते आणि अटक करण्याचे अधिकार आहेत.अशा सीबीआय, एनआयए, ईडी, एनसीबी, डीआरआय, एसएफआयओ आणि इतर कोणत्याही एजन्सीच्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे आणि रेकॉर्डिंग उपकरणे बसविण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायमूर्ती आर एफ रोहिंटन यांच्या अध्यक्षते खालील खंडपीठाने सांगितले.सर्वोच्च न्यायालयाने २ डिसेंबर रोजी आदेश दिला आहे

### न्यायमूर्तींनी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

.

सीसीटीव्ही प्रणालीमध्ये नाईट व्हिजनसह सुसज्ज असणे आवश्यक आहे आणि त्यामध्ये ऑडिओ तसेच व्हिडिओ फुटेज असणे आवश्यक आहे”.

सीसीटीव्हीचे काम, देखभालआणि रेकॉर्डिंगची जबाबदारी संबंधित पोलिस स्टेशनचे मुख्य पोलीस निरिक्षकांची असेल, असेही या अहवालात नमूद केले आहे.

प्रत्येक पोलिस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही बसविणे आणि पोलिसांकडून प्रत्येक साक्षीदारांची तपासणी सी.सी.टी.व्ही रेकार्डिंग सह झाली पहिजे यासंदर्भात हा आदेश आला आहे.

त्यात म्हटले आहे की सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर आणि / किंवा नेटवर्क व्हिडिओ रेकॉर्डरमध्ये संग्रहित केले जावे. महत्त्वाचे म्हणजे रेकॉर्डिंग सिस्टम अशी असावी की त्यामध्ये साठलेला डेटा १८ महिन्यांसाठी संरक्षित असेल..

खटल्यामध्ये सत्याचा शोध घेण्यापेक्षा,भांडण मिटविणे ही प्राथमिकता असेल तर असे न्यायदान पाखंड असते.

# नोकरशाहीवर तिसऱ्या डोळ्यांचा वचक हवा

# प्रत्येक सरकारी कार्यालयात सी.सी.टी.व्ही.लावा.

नुकताच सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व तपास यंत्रणा व सर्व पोलीस स्टेशन मध्ये सी.सी.टी.व्ही लावण्याचा आदेश दिले आहेत.तसेच आदेश प्रत्येक सरकारी कार्यालयासाठी देणे ही काळाची गरज आहे.

आपल्या देशात गोवा सरकारने नोव्हेंबर २०१९ मध्ये सर्व सरकारी कार्यालयात सीसीटीव्ही लावण्याचा निर्णय घेतला आहे. हा गोवा पॅटर्न संपूर्ण देशभर लागू होणे आवश्यक आहे.माहिती अधिकार कार्यकता महासंघ देशभरातील सर्व कार्यालयात सीसीटीव्ही लावा अशी मागणी करीत आहे.




**सरकारी कार्यालयात काम करण्यासाठी जेव्हा सामान्य माणूस जातो तेव्हा त्यांच काम होईल की नाही या भितीने जर त्याच्या छातीत धड-धड होत असेल तर ते सरकार धड नसतं व ती यंत्रणाही धड नसते.**

## प्रत्येक सरकारी कार्यालयात सीसीटीव्ही बसवले तर पुढील प्रमाणे सुधारणा होतील.

१. अधिकाऱ्या कार्यालयात थेट लाच घेता येणार नाही
२.कर्मचाऱ्यांना कार्यालयात वेळेवर यावंच लागेल.
३.कार्यालयात कर्मचाऱ्यांना टाईमपास करता येणार नाही
४.जनतेशी सौजन्याने बोलावं लागेल.
५.अधिकारांचा गैरवापर कमी होईल
६.कामात भेदभाव करता येणार नाही.
७.कार्यालयातील पाददर्शकता वाढेल
८.प्रशासन उत्तमपणे चालण्यास मदत होईल
९.जनतेचा प्रशासनावर वचक राहिल.
१०.पब्लिक सर्व्हटची कार्यक्षमता वाढेल

आपण जे काम करतो त्यावर कोणाची तर नजर आहे असं वाटलं की जो काम करतो त्यांच्या कामात सुधारणा होते. हा स्वाभाविक नियम आहे.

शासनावर जनतेचा दबाव पाहिजे.तसेच प्रशासनावर जनतेची करडी नजर पाहिजे.

प्रत्येक सरकारी कार्यालयात काय काम होत आहे.व काय काम झालं आहे.याचं दृष्य रेकार्ड केलं जाणं ही काळाची गरज बनली आहे.

तंत्रज्ञानाचा आधार घेऊन प्रशासनात सुधारणा करणे अतिशय आवश्यक आहे.

सरकारी कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज जनतेला सहज उपलब्ध झालं पाहिजे.

असं झालं तर सरकारी कार्यालयातील अनागोंदी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन प्रशासन उत्तम होईल.

बलपूर्वक कायदा राबवून नव्हे तर समाजाच्या शहाणपणाची पातळी वाढवून खरा सामाजिक सलोखा निर्माण होत असतो.

# लबाड लांडगा ढोंग करतोय !
# माहिती नाकारण्याचं सोंग करतोय

## जनमाहिती अधिकाऱ्यांचे माहिती नाकारण्याचे दस बहाने !

माहिती अधिकार कार्यकर्ते व सर्वसमान्य जनता यांनी ही गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे की माहिती अधिकार हा कायदा निष्प्रभ करण्यासाठी शासन व प्रशासनांने खूप मोठा खेळ खेळला आहे.

माहिती अधिकारात माहिती मागीतली की ती काहीतरी कारण व बहाना सांगून द्यायची नाही असे प्रशासनाने मुकपणे ठरवले आहे.

सरकारने माहिती न दिल्या बद्दल शास्ती व दंड देणारी आयुक्त नावाची शिखर संस्था अप्रभावी कशी राहिल याची पूरेपूर काळजी घेतली आहे.

आजकाल जनमाहिती अधिकारी हे माहिती अधिकारी राहिलेले नसून माहिती नाकार अधिकारी झाले आहेत.

काहीही बहाना करा पण माहिती देणं नाकारा हा हे प्रशासनाच ठरलं आहे.

पण माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आता अशा परिस्थितीत अधिक सावध व अधिक चिकाटीने व अधिक सजगपणे काम करणे आवश्यक आहे.

आपण आपला माहिती अधिकार अर्जच इतका प्रभावी व परिपूर्ण केला पाहिजे की जनमाहिती अधिकारी यांची माहिती नाकारण्याची हिमंत होणारच नाही. आपण कच्चे खिलाडी राहिलो तर आपले अर्ज नाकारले जातात पण आपण जर अतिशय पक्के खिलाडी असू तर आपले अर्ज नाकारले जाणार नाहीत.

आपण कशाप्रकारे प्रभावी माहिती अधिकार कार्यकर्ता झालं पाहिजे याचं मार्गदर्शन येथ वेळोवेळी केले जाईल.

आपला आभ्यास आपले ज्ञान व आपले चारित्र्य यांच्यात आपण वाढ केली तर आपला अर्ज नाकारला जाणार नाही-

१. आपला अर्ज दिडशे शब्दा पेक्षा जास्त आहे.

२. एका वेळी एकच विभागाशी संबधीत माहिती नाही.

३. विविध विभाग व विविध विषयांची माहिती मागीतली आहे.

४. माहिती प्रश्नार्थक स्वरूपात मागतली असल्याने देता येत नाही.

५. आपण मागीतलेली माहिती विस्तृत स्वरूपाची व खूप मोठ्या प्रमाणावर मनुष्य बळ वळावावे लागणार असल्याने माहिती देता येणे शक्य नाही.

६. माहिती तृतीय पक्षासी संबंधीत असल्याने देता येणार नाही.

७. कलम ८ अ नुसार माहिती नाकारण्यात येत आहे.

८. आपल्या अर्जातील माहितीच्या तपशीलचा अर्थबोध होत नाही.

९. माहितीचा अर्ज स्विकारण्यास व ओ.सी.वर शिक्का मारून देण्यास स्पष्ट नकार देणे.

१०. अर्ज केल्यावर ३० दिवस उलटून गेले तरी कसलीही माहिती वा प्रतिसाद न देणे.

# माहिती अधिकार कार्यकता व्हा !

खूप कार्यकर्ते मला विचारतात की मी माहिती अधिकार कार्यकर्ता झालो तर मला काय मिळेल ?

ही समाजसेवा आहे. पैसे सोडून इथे इतर खूप व्यक्तिगत लाभ मिळतात.जसे की......

१. विविध कायद्याची व नियमांची माहिती होते.

२. प्रशासन नोकरशाही व सरकारी यंत्रणा कशी काम करते, ते माहीत होते.

३. सरकार मध्ये लाच न देता आपले काम करून घेता येते.

४. आपल्या आसपासच्या मित्र नातेवाईक शेजारी इत्यादी चे सरकारी कामात अडवणूक होत असेलतर मदत करता येते.

५. अनुभवी कार्यकर्ते यांच्या ओळखी होतात.

६. माहिती अधिकार व्हाट्सअप्प ग्रुपअधून रोज व सतत माहिती आणि प्रशिक्षण मिळते.

७. व्यक्ती धीट बनते.आत्मविश्वास वाढतो.

८. प्रशासन पारदर्शी व लोकाभिमूख बणवण्यात आपले योगदान देता येतं.

९. आपलं **drafting** (लिखाणाची मांडणी) सुधारते.

१०. नागरिक म्हणून आपले हक्क व कर्तव्ये यांची जाणीव होते.

आयुष्यात तुम्ही कोणतंही काम करा. नोकरी करा.व्यवसाय करा. तुमच्या आवडीच्या किंवा संधी मिळेल त्या कोणत्याही क्षेत्रात काम करा.पण तुम्ही काही दिवस किमान तीन वर्षे तरी माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून आवश्य काम करा.जीवनात खूप शिकायला मिळतं.

चला आमच्या बरोबर काम करण्यासाठी या लिंकवरून सभासद फॉर्मभरा.

**rtimahasangh.weebly.com**

# माहिती अधिकार नमूना अर्ज

माहिती अधिकार कार्यकर्ते मित्रहो,

नागरिक अधिकार मासिकांच्या प्रत्येक अंकात एक कार्यालयाचा माहिती अधिकार नमूना दिला जाईल. हा नमूना आपण आपल्या सोयी प्रमाणे काही बदल कररून वापररू शकता.जिल्हा अन्न व औषध प्रशासन विभागाचे प्रत्येक जिल्हा स्तरावर कार्यालय असते. तेथे जनतेला सर्व प्रकारच्या हॉटेल, खानावळ,रेस्टारेंट मसाला वडापाव चायनीज आदी सर्व प्रकारच्या अन्न विक्री व अन्न उत्पादनाचे परवाने दिले जातात या कार्यालयाचा महाभ्रष्ट कार्यालय म्हणून लौकिक आहे. तरी आपण माहिती अधिकार वापररून या कार्यालयाची पारदर्शकता निर्माण व्हावी व तेथील अधिकारी कर्मचारी यांनी जनतेप्रती अधिक जबाबदारीने वागावे म्हणून प्रयत्न करावा.

---

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
जिल्हा अन्न व औषध प्रशासन कार्यालय
(अन्न विभाग)
जिल्हा -----------------------

१) अर्जदाराचे पूर्ण नाव : -------------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :----------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------

३) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व कालावधी :

अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ व नियमने २०११ अंतर्गत अंमलबजावणीची आपल्या कार्यालयातील माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये सन २०१८ व २०२० आज अखेरपर्यतची माहिती मिळणेबाबत.

४) माहितीचा तपशील :

१) सन २०१८ व २०२० अखेरपर्यत आपल्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी अन्न सुरक्षा अधिकारी यांनी व्यापारी व व्यावसायिक व अन्न उत्पादक यांचे घेतलेल्या प्रत्येक अन्न नमूना सँपल ची ज्या कागदावर /ज्या नोंदवहीत /ज्या रजिस्टर मध्ये नोंद केले आहे. अशा प्रत्येक नोंदीच्या सर्व छायाप्रती देण्यात याव्यात.

२) सन २०१८ व २०२० अखेरपर्यत आपल्या कार्यालयातील सक्षम अधिकारी यांनी व अन्न सुरक्ष अधिकारी यांनी अन्न व्यावसायिकाकडून घेतलेल्या प्रत्येक अन्न नमूना तपासणीसाठी ताब्यात घेताना अन्न नमुन्याची बाजार मूल्य इतकी रक्कम दिल्याचा पूरावा म्हणून घेतलेल्या सर्व पावतीच्या छायाप्रती देण्यात याव्यात.

३)सन २०१८ व २०२० अखेरपर्यत तपासाचा भाग म्हणून प्रत्येक अन्न व्यावसायिकांच्या सक्षम अधिकारी यांनी ताब्यात घेतलेल्या हिशोब वहया व अकाउंट बूक्स ची माहिती देण्यात यावी. प्रत्येक अन्न व्यावसायिकाचे नाव हिशोब वहया ताब्यात घेतलेला दिनांक व हिशोब वहया परत दिलेला दिनांक यांची आपल्याकडे योग्य त्या रजिस्टरला असलेल्या नोंदीच्या झेरॉक्स द्याव्यात.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: स्पीड पोष्टाने पाठवावी /माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही ( १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : -----------------

दिनांक : ---------------- (नाव ---------------------------)

ही संपूर्ण जाहिरात आवश्यक वाचा. आपके फायदे की बात !

## तुमचा बिझीनेस नोंदणी करा. फ्री फ्री फ्री फ्री फ्री

१.तुमच्या कोणता का होईना व्यवसाय आहे ?
२.तुम्हाला नवे-नवे ग्राहक हवे आहेत का ?
३.तुम्हाला तुमच्या व्यवसायाची भरभराट करायची आहे ?
४.तुम्ही रायल डिस्काऊंट होल्डर ग्राहकांना तुमच्याकडे केलेल्या रोख खरेदी वर थोडा का होईना डिस्काऊंट द्यायला तयार आहात का ? या सर्व प्रश्नाची उत्तरे जर होय असतील तर तुमच्या व्यवसायाची **www. royaldiscountcard. com** या बिझीनेस प्रमोशन वेबसाईटवर नोंदणी करा. फ्री फ्री फ्री फ्री फ्री




**www. royaldiscountcard.com** ही तुमच्या व्यावसायाचा प्रचार व प्रसार करणारी व तुम्हाला नव नवीन ग्राहक मिळवून देण्याचा प्रयत्न करणारी बिझीनेस प्रमोशन वेबसाईट आहे.गुगल सर्च करून वेबसाईटवर जा. तेथे दुकान / व्यावसाय नोंदणी च्या लिंकवर जाऊन नोंदणी करा. ज्यांच्याकडे रॉयल डिस्काऊंट कार्ड आहे अशा ग्राहकांनी जर तुमच्याकडून वस्तू किंवा सेवा खरेदीवर एकाचवेळी पाचशे / हजार / किंवा त्यापेक्षा अधिकची रोख खरेदी केली तर त्यावर ग्राहकाला ०२ टक्के / ०३टक्के / ०५ टक्के / १० टक्के / १५ टक्के / २० टक्के या पैकी कोणताही एक डिस्काऊंट देण्यास तयार असणाऱ्या व्यावसायिकांला त्यांच्या व्यावसायाची मोफत नोंदणी करता येईल. नोंदणी करताच १२ तासात तुमचा व्यवसाय वेबसाईटवर डिस्प्ले होईल.

नोंदणी झालेला तुमचा व्यवसाय तुमच्या परिसरातील लाखो रॉयल डिस्काउंट कार्ड धारक -ग्राहकापर्यंत पोहचवला जाईल.त्यातून मोठ्या प्रमाणात तुमची मोफत जाहिरात ही होईल. तसेच तुम्हाला सतत नव नवे ग्राहक मिळत राहतील. तुमच्या व्यावसायचे मोफत प्रमोशन होऊन जाईल.

तुम्हाला तुमची नोदणी फ्री मध्ये करता येईल.

तसेच पाहिजे तेव्हा डिसप्ले व नोंदणी रद्द सुद्धा करता येईल.

## तुमच्या नावाचं डिस्काऊंट कार्ड फ्री फ्री फ्री फ्री फ्री फ्री फ्री




**www.royaldicountcard.com**

ही वेबसाईट गुगल सर्च करा.
फ्री कार्ड साठीच्या लिंकवर जाऊन तुमचा कॉर्ड होल्डर फार्म भरा.तुम्हाला २४ तासाच्या आत तुमच्या व्हॉटसअॅप नंबर वर रॉयल डिस्काऊंट कार्डची डिजीटल कॉपी पाठवली जाईल.त्याची कलर प्रिंट काढून व लॅमिनेशन करून तुम्ही कार्ड जवळ बाळगू शकता.

### हे कार्ड दाखवून डिस्काऊट कसा मिळवायचा ?

याच वेबसाईटवर तुमच्या जिल्हा व परिसरातील डिस्काऊटं देण्यास तयार असणाऱ्या दुकानदार व व्यावसायिकांची नोंदणीकृत यादी दिलेली असते.अशा व्यावसायिकाकडे तुम्ही मध्यम व मोठया खरेदीवर चांगल्या पैकी डिस्काऊट मिळवून भरपूर पैशाची बचत करू शकता.
या कार्डाची मुदत तीन वर्षाची असते.तीन वर्षात तुम्ही तुमच्या विविध गरजेच्या वेळी लहान-मोठी खरेदी करीतच असता.तुमच्या गरजेच्या वस्तू व सेवांची खरेदी तुमच्या जिल्हा व परिसरातील जे व्यावसायिक वेबसाईट वर नोंदणीकृत आहेत.त्यांच्याकडूनच केल्यास ते तुम्हाला नक्कीच चांगला डिस्काऊंट देणार म्हणजे देणारचं.

WhatsApp **703 9736 703**
Only whatsApp, No call please !
www.royaldicountcard.com

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, विंग फ्लॅट-३०५ वसूधा सोसायटी प्लॉट नं.५३ सेक्टर-४ बी आसूडगांव खांदा कॉलनी ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. RNI रजि नं. MAHMAR/2011/40781